CNR NO MHSO06-000779-2021

स्पे. मु.नं. ८१/२०२१

अब्जलबी महामुद्दीन इनामदार

वि.

तबस्सुम युसूफ शेख वगैरे

## नि. ५ वरील आदेश
## (घोषित दि. २२/०७/२०२२)

०१. अर्जदार/वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे तात्पुरत्या मनाई हुकूमासाठी प्रस्तुतचा अर्ज सादर केलेला आहे. मौजे. कासेगांव, ता. पंढरपूर, जि. सोलापूर येथील जमीन गट क्र.१६१४/२अ क्षेत्र २६ आर. क्षेत्राबाबत दि.३१/०७/२०१८ रोजी झालेले नोंदणीकृत दस्त क्र.२९४५/२०१८ या दाव्याचा वादविषय असून मिळकतीच्या चतुःसिमा पूर्वेस–गट क्र.१६१४/२/ब, पश्चिमेस–गट क्र.१७६९, उत्तरेला गट क्र.१६१६/१ व दक्षिणेस गट क्र.१७६९ अश्या आहेत. त्या चतुःसिमेच्या आतील मिळकतीला या पुढे '*वादग्रस्त मिळकत तथा वादग्रस्त दस्त*' असे संबोधण्यात येईल.

०२. **अर्जदाराची हकिकत थोडक्यात पुढीलप्रमाणे आहेः–**

वादी क्र. १ ते ४ हे आपासात बहिण–भाऊ असून प्रतिवादी क्र. ४ चे वडिल आहेत. वादग्रस्त मिळकत वादी व प्रतिवादी क्र. ४ यांचे वडिलोपार्जित एकत्र कुटुंबाची मिळकत आहे जी प्रतिवादी क्र. २ चे नावे नोंदविण्यात आलेली आहे. प्रतिवादी क्र. २ यांना कोणतेही आर्थिक निकड नव्हती तसेच एकत्र कुटुंबाच्या कोणत्याही

कायदेशीर गरजा नव्हत्या. प्रतिवादी क्र. १ ही वादीच्या भावकीतील आहे. प्रतिवादी क्र. २ हे अशिक्षीत व भोळसर असल्यामुळे प्रतिवादी क्र. १ च्या पतीने त्यांच्या स्वभावाचा गैरफायदा घेवून फसवणूक केली, 'साक्षीदार म्हणून अंगठा करा' असे सांगून प्रतिवादी क्र. २ कडून दि.३१/०७/२०१८ रोजी वाद मिळकतीचे बनावट, पोकळ, बिना भरण्याचे खरेदीखत प्रतिवादी क्र. १ च्या नावे फसवणुकीने नोंदवून घेतले. प्रतिवादी क्र. १ ने बेकायदेशीर खरेदीखताच्या आधारे स्वतःच्या नावाची नोंद वाद मिळकतीकरीता करुन घेतली व आता या नोंदीच्या आधारे वाद मिळकत विक्री करण्याच्या तयारीत आहेत. प्रतिवादी क्र. १ हिने वाद मिळकत हस्तांतरीत केल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. वादीने सदरचे खरेदीखत रद्द होवून मिळणेकरीता प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. वादीच्या हक्कात सकृतदर्शनी केस व न्यायाचा समतोल आहे. अश्या परिस्थितीत दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो प्रतिवादी क्र. १ हिने दावा मिळकत गहाण, दान, लिज, विक्री, कर्ज, बोजा किंवा अन्य मार्गाने तबदिल करु नये असा तात्पुरता मनाई हुकूम देण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

०३. प्रतिवादी क्र. २ यांनी **नि.क्र. २३** व्दारे आपली कैफियत दाखल करुन वादीचा दावा मान्य केलेला आहे.

०४. प्रतिवादी क्र. १ यांनी **नि.क्र. १९** व्दारे दाव्यातील सर्व कथने स्पष्टपणे नाकारलेली आहेत. आपल्या कैफियतीमध्ये असे नमूद केले आहे की, वादी व प्रतिवादी

क्र. २ यांनी संगनमताने प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. दाव्यातील उभय पक्षकार हे मुस्लीम असून मुस्लीम कायदयातील तरतुदींनुसार एकत्र कुटुंबाची अथवा वडिलोपार्जित मिळकत आहे असे म्हणता येणार नाही. प्रतिवादी क्र. २ यांनी वाद मिळकत प्रतिवादी क्र. १ याला मोबदला रक्कम मिळाल्यानंतर नोंदणीकृत खताव्दारे नोंदवून दिलेली आहे. मिळकत खरेदी केल्यानंतर त्यांनी वाद मिळकतीमध्ये पंधरा ते वीस लाख रुपये खर्च करुन द्राक्षाची बाग लागवड केलेली आहे. सदर बाबीमुळे वादी तथा प्रतिवादी क्र. २ यांच्या मनामध्ये आकस निर्माण झालेला आहे. वादींना दावा दाखल करण्याचा अधिकार नाही. दावा कायदेशीर कसोटींवर टिकणारा नाही. वादीला सकृतदर्शनी कोणतीही केस नाही, प्रतिवादी क्र. १ यांना सकृतदर्शनी केस असून तात्पुरता मनाई हुकूम पारीत झाल्यास त्यांचे अतोनात नुकसान होणार आहे. सबब, प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

०५. उभय पक्षांचा युक्तिवाद ऐकला व कागदपत्रांचे अवलोकन केले.

०६. माझ्यासमोर पुढील मुद्दे उपस्थित होतात त्यावरील माझे निष्कर्ष व कारणमिमांसा खालीलप्रमाणे आहे.

| क्रं. | **मुददे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अर्जदार/वादी यांना प्रथमदर्शनी केस आहे काय ? | नाही. |
| २ | दाव्याचा समतोल अर्जदार/वादी यांच्या लाभात | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | आहे काय ? | |
| ३ | तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज नामंजूर झाल्यास अर्जदाराचे/वादीचे नुकसान संभवते काय ? | नाही. |
| ४ | अंतीम आदेश काय ? | अर्ज नामंजूर करण्यात आला. |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र. १ ते ३ करीताः–**

०७. वरील सर्व मुद्दे हे एकमेकांशी निगडीत असल्याने चर्चेकरीता एकत्रीत घेण्यात आलेले आहेत. तात्पुरत्या मनाई हुकूमाचा अर्ज निकाली काढताना उभय पक्षांतर्फे दाखल करण्यात आलेली कागदपत्रे, शपथपत्रे तथा सकृतदर्शनी केस इ. बाबी लक्षात घेणे आवश्यक असून न्यायाचे पारडे कोणाच्या बाजूने आहे तथा तात्पुरता मनाई हुकूम न दिल्यास कोणाचे नुकसान होणार आहे या बाबी पाहणे महत्वाचे आहे. अश्या परिस्थितीमध्ये वाद मिळकतीचा ७/१२ उतारा, खरेदीखताची छायांकीत प्रत इ. कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले.

०८. वादी तथा प्रतिवादी क्र. २ हे आपसात मुले व वडिल असून वादीच्या म्हणण्याप्रमाणे वाद मिळकत त्यांची वडिलोपार्जित मिळकत आहे. वादींच्या म्हणण्यानुसार खरेदीखत नोंदवून देणेकरीता प्रतिवादी क्र. २ यांना कोणतीही कायदेशीर गरज नव्हती अथवा एकत्र कुटुंबांनादेखील कायदेशीर आवश्यकता नव्हती, प्रतिवादी क्र.

१ हिने तिच्या पतीच्या सहाय्याने प्रतिवादी क्र. २ यांची फसवणुक करुन खरेदीखत नोंदवून घेतलेले आहे. निश्चितपणे वादी व प्रतिवादी क्र. २ हे मुस्लीम असून मुस्लीम कायदयाप्रमाणे मुस्लीम एकत्र कुटुंब किंवा मुस्लीम एकत्र कुटुंबाची मिळकत अशी व्यवस्था नाही. मुस्लीम कायदयाप्रमाणे कुटुंबातील व्यक्तीच्या मृत्युनंतर त्या व्यक्तीच्या मिळकतीमध्ये इतर सदस्यांचा पूर्वीच ठरवून दिल्याप्रमाणे वाटपाचा हक्क व अधिकार आहेत. परंतु या हक्कांची अंमलबजावणी केवळ संबंधीत व्यक्ती मयत झाल्यानंतर करता येवू शकते. प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी क्र. २ यांच्या मिळकतीमध्ये हिस्सा मागण्याचा आजरोजी वादींना कोणताही अधिकार नाही. दुसरी महत्वाची बाब म्हणजे प्रस्तुतच्या दाव्यामध्ये केवळ वादग्रस्त खरेदीखत हे रद्दबातल होवून मिळणेकरीता विनंती करण्यात आलेली असली तरी इतर अनुषांगिक कोणतीही दाद मागण्यात आलेली नाही. अश्या परिस्थितीमध्ये दावा कायदयाच्या कसोटीवर टिकणारा आहे किंवा नाही ही बाब सखोल पुरावा नोंदविल्यानंतर ठरविणे योग्य आहे.

०९. प्रतिवादी क्र. १ यांच्या हक्कात दि. ३१/०७/२०१८ रोजीचे नोंदणीकृत खरेदीखत असून प्रतिवादी क्र. २ यांनी ते खरेदीखत दावा दाखल करेपर्यंत अव्हानीत केलेले नाही. प्रतिवादी क्र. १ यांच्या हक्कातील खरेदीखत हे नोंदणीकृत असल्यामुळे तात्पुरता मनाई हुकूमाचा अर्ज निकाली काढताना अश्या नोंदणीकृत दस्ताला जास्त महत्व देणे आपेक्षीत आहे. खरेदीखताच्या आधारे प्रतिवादी क्र. १ दावा

मिळकत हस्तांतरीत करण्याचे तयारीत आहेत अथवा त्यामध्ये तबदीली करण्याच्या तयारीत आहेत असे दाखविण्याकरीता कोणताही सकृतदर्शनी पुरावा वादीतर्फे पटलावर आलेला नाही. सबब, वादीच्या हक्कात सकृतदर्शनी केस आहे असे म्हणता येणार नाही. दाव्याचे स्वरुप लक्षात घेता तात्पुरता मनाई हुकूम न दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. परंतु तसा तात्पुरता आदेश पारीत झाला तर प्रतिवादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. न्यायाचे पारडे प्रतिवादीच्या बाजूने आहे, अश्या परिस्थितीत वादी विनंती केल्यानुसार तात्पुरता मनाई हुकूम मिळणेस पात्र नसल्याचे माझे मत झाले आहे, सबब मी मुद्दे क्रं. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी देतो.

**<u>मुद्दा क्रं. ४ करिता–</u>**

१०. वरील सर्व विवेवचनावरुन मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

१ अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२ खर्च मुळ दाव्यामध्ये.

AMIT ASHOKRAO KHANDALE
Digitally signed by AMIT ASHOKRAO KHANDALE
Date: 2022.07.22 17:05:05 +0530

**दि. २२/०७/२०२२.**

**(अमित अ.खंडाळे)**
**२ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,**
**पंढरपूर.**

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per the original order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Employee | : | Shirsikar V. G., Stenographer |
| Court | : | 2nd Jt. C.J.S.D. Pandharpur |
| Date | : | 22.07.2022 |
| Judgment/order signed by | : | |
| the Presiding Officer on | : | 22.07.2022 |
| Judgment/Order uploaded | | |
| on | : | 22.07.2022 |